सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी नगरपरिषद वाडी, जिल्हा नागपूर पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. ५९ /पापु १४
जी. टी. रुग्णालय इमारत संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : १४ मे, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.८.२००९
२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे क्रमांक: नपाप्र/अ.का. १९(१)/कावि-६८/२०१९ , दिनांक २७.०३.२०१९ चे पत्र
३) शासन पत्र, क्रमांक स्थासबै २०१८/प्र.क्र.२०१/पापु १४, दिनांक १०.०५.२०१९ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, नागपूर यांनी सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी नगरपरिषद वाडी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत रुपये ४१.५९ लाख इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०९.०५.२०१९ रोजी झालेल्या बैठकांत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

नगरपरिषद वाडी ने प्रस्तावित केलेल्या टंचाई अंतर्गत उपाययोजना घेणे आवश्यक असल्याने त्यांच्या मागणीतील एकूण ३० विंधन विहीरीच्या रुपये ४१.५९ लाख किंमतीच्या प्रस्तावित केलेल्या कामामधील काही कामे तसेच संगणक चार्जेस वगळून एकूण रुपये ४०.५५ लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय -

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी नगरपरिषद वाडी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांना प्रस्तावानेत नमुद केल्याप्रमाणे रुपये ४०.५५ लाख (रुपये चाळीस लाख पंचावन्न हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास या आदेशान्वये खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नगरपरिषद वाडी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर योजनेच्या किंमतीच्या एकूण रुपये ४०.५५ लाख खर्चाच्या ९०% म्हणजेच रुपये ३६.४९ लाख इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १०% रुपये ४.०६ लाख एवढी रक्कम लोकवर्गणी म्हणून नगरपरिषद वाडी यांनी भरावयाची आहे.

३) सदर योजनेची १० टक्के लोकवर्गणी पोटी नगरपरिषद वाडी यांनी प्रथमत: खर्ची टाकल्यानंतरच उर्वरीत निधी विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांचे मार्फत नगरपरिषद वाडी यांना वितरीत करण्यात यावा.

४) सदर योजनेची अंमलबजावणी नगरपरिषद वाडी यांच्या मार्फत करण्यात यावी.

५) स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार नगरपरिषद वाडी क्षेत्रामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या विंधन विहिरींची स्थळ निश्चिती भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यांच्यामार्फत करण्यात यावी. तसेच भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने प्रमाणीत केलेल्या ठिकाणी नविन विंधन विहिरी घेण्यात याव्यात.

६) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत तसेच योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

७) विभागीय आयुक्त, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस देय अनुदानाच्या ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित ३०% निधी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर योजनेची प्रगती आढावा विचारात घेऊन वितरीत करावा. उर्वरित २०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

८) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेतर)-३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०९.०५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५१३११२३०८४५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YASHWANT TEDGYA PADVI

Digitally signed by YASHWANT TEDGYA PADVI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080,
postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86,
ou=WSSD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=YASHWANT TEDGYA PADVI
Date: 2019.05.14 12:38:10 +05'30'

(य.टे. पाडवी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, नागपूर

९. जिल्हाधिकारी, नागपूर
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद वाडी, जि. नागपूर
११. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१२. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१३. पापु १४ (निवडनस्ती)